सकाळ TODAY

कोल्हापूर, सोमवार, ३ ऑगस्ट २०२६



पन्हाळा : येथे पन्हाळा ते पावनखिंड मोहिमेस शुभेच्छा देताना प्रा. अभयकुमार साळोखे, पन्हाळा नगराध्यक्षा जयश्री पोवार, उपनगराध्यक्ष सतीश भोसले आदी.

# 'विवेकानंद'च्या २०० विद्यार्थ्यांची पन्हाळा-पावनखिंड मोहीम

पन्हाळा, ता. २ : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळगड ते पावनखिंड ही गनिमी कावा मोहीम अत्यंत खडतर परिस्थितीत यशस्वी केली होती. या ऐतिहासिक संग्रामात वीर बाजीप्रभू देशपांडे आणि शिवा काशीद यांच्यासह अनेक मावळ्यांनी स्वराज्यासाठी बलिदान दिले. हाच पराक्रमी इतिहास आणि त्यामागील संघर्ष आजच्या युवा पिढीला समजावा, या उद्देशाने या मोहिमेचे आयोजन केले आहे,' असे प्रतिपादन विवेकानंद शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. अभयकुमार साळोखे यांनी केले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था (कोल्हापूर) संचालित इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्यातर्फे आयोजित 'पन्हाळगड ते पावनखिंड पदभ्रमंती मोहिमे'च्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते.

विवेकानंद शिक्षण समूहाची ही पहिलीच मोहीम असून, यामध्ये २०० युवक-युवतींनी उत्साहाने सहभाग घेतला. मोहिमेच्या सुरुवातीला पन्हाळगडावरील वीर शिवा काशीद व बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास प्रा. अभयकुमार साळोखे, पन्हाळा नगराध्यक्षा जयश्री पोवार आणि उपनगराध्यक्ष सतीश भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यार्थ्यांना मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या. ऐतिहासिक वारसा अनुभवण्यासाठी निघालेल्या या युवा मावळ्यांच्या उत्साहाने पन्हाळगड आणि पावनखिंडचा मार्ग 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेला.